IMPACT FACTOR : 4.197 (IIJIF)

ISSN: 2454-5503

# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES

A Peer Reviewed Bimonthly International Journal

VOL. 8 | ISSUE 6| NOV - DEC 2022

Book 3

*Editor in Chief*

**Dr Kalyan Gangarde**

*Guest Editors*

**Dr Vasant Satpute**

**Dr Vitthal Ghule**

**Dr Haribhau Kadam**

# CONTENTS


1. पंचायत राज व्यवस्था आणि प्रशासकीय सुधारणा
सुभाष किशनराव पोले 06
2. महाराष्ट्रातील सत्यषोधकी जलसा चळवळ
डॉ. धर्मराज शिवाजी पवार 13
3. मराठवाडयातील उच्च शिक्षणाची सद्य:स्थिती
स्वाती बालासाहेब देशमुख 18
4. आदिवासी साहित्य
गायकवाड सुनिता रामराव 21
5. भारतीय समाजातील विस्थापीतांचे पुर्नवसन एक अभ्यास
डॉ. गोपाळ मदन गांगर्डे 24
6. वर्तमान मराठी भाषा व साहित्य (विशेष संदर्भ 'गिनिपिग' कादंबरी )
प्रा. डॉ. काळे बी. एम. 27
7. मानव संसाधन व्यवस्थापन
डॉ. शिंदे सुरेखा सदाशिवराव 30
8. राष्ट्रीय कुटुंब कल्याण कार्यक्रमाचे महिलांच्या आरोग्यस्थिती तील योगदान
डॉ. सुषमा शंकर तिनगोटे 34
9. दलित साहित्यातील निवडक आत्मकथने
प्रा.राहुल भागवत गायकवाड 37
10. गुप्तकाळ प्राचीन भारतीय संगीतातील एक सुवर्णयुग
अमोल शेषराव गवई 44
11. लिंग भेद व व्यावसायिक समाजकार्य
डॉ. चंदु रामभाऊ पाटील 47
12. नागरी सहकारी बँका आणि पतसंस्थाच्या कर्जवितरणाचे तुलनात्मक अध्ययन
डॉ. आर. एस. शिंदे, कोकरे तुकाराम सिताराम 49
13. शैक्षणिक क्षेत्रातील खाजगीकरण
सुचिता सुभाषराव ढोणे 52
14. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त निवडक मराठी साहित्यिक विचारवंतांचा मुल्यात्मक प्रबोधन जागर
प्रा.पुरुषोत्तम प्र.सूर्य 55
15. घटस्फोट भारतीय समाजातील एक सामाजीक समस्या
डॉ. सुर्यवंशी व्हि. एम. 60
16. सायबर क्राईम : ज्वलंत सामाजिक समस्या आणी जनजागृती
प्रा. डॉ. सुनिता आत्माराम टेंगसे 62
17. कवी देविदास माने यांच्या मनमौन कवितासंग्रहातील राष्ट्रभक्ती
डॉ. बालाजी विठ्ठलराव डिगोळे 66
18. घटस्फोट समस्येचे समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून विश्लेषण
प्रा.विक्रम लक्ष्मणराव भुतेकर 71


Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani

6

# वर्तमान मराठी भाषा व साहित्य.

(विशेष संदर्भ 'गिनिपिग' कादंबरी )

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani

**प्रा. डॉ. काळे बी. एम.**
कै. रमेश वरपुडकर महाविद्यालय, सोनपेठ

भावात्मक, कथात्मक, नाटयात्मक असे साहित्याचे तीन प्रकार मानले जातात. भावात्मक साहित्यात ' भावनेला' कथात्मक साहित्यात 'कथनाला' तर नाटयात्मक साहित्यात 'नाटया' ला महत्व असते. साहित्यकृती ही शब्दरुप असते. हे शब्दरुप काव्य. कथा, नाटय इत्यादी प्रकारचे असते. साहित्यकाची प्रतिभा या रुपाद्वारे प्रकट होत असल्यामुळे साहित्यकृती ही एक भाषिक घटना असते. भूतकाळातील कोणतीही घटना आपण भाषेमुळे सांगू शकतो तर भविष्यकाळातील घटना कल्पनेने वर्णन करु शकतो. भाषेची ही शक्ती निवेदनप्रधान साहित्यात खूप महत्वाची ठरली आहे. बदल हा भाषेचा मुख्य गुण आहे. ती सतत प्रवाही असते. ती व्यक्तीपरत्वे, जातीजमातीनुसार, भौगोलिक प्रदेशानुसार व कालागणिक बदलते. प्रस्तुत शोध निबंधात वर्तमान मराठी भाषाचा साहित्यावर पडलेला प्रभाव आपणास राकेश वानखेडे यांच्या 'गिनिपिग' या कादंबरीच्या अधारे घ्यावयाचा आहे.

**उद्दिष्टे :-**

I)वर्तमान मराठी भाषा व मराठी साहित्यातील परस्पर सबंधांचा शोध घेणे.

II) वर्तमान मराठी भाषेचा साहित्यावर पडलेला प्रभाव याचा शोध घेणे.

III) ग्लोबलायझेशन व खाजगीकरणामुळे सामान्य माणसाचे होणारे वस्तुकरण याचा गिनिपिग कादंबरी अधारे अभ्यास करणे.

IV) आपला उत्कर्ष करावा की मूल्य धरुन चालावे यातील संघर्ष गिनिपिग कादंबरीच्या द्वारे तपासणे.

V) गिनिपिग कादंबरीत काही खास वैशिष्ट्यूपर्ण शब्द, म्हणी, वाक्प्राचाराचा शोध घेणे.

VI) आहिराणी भाषेतील संवादाचा 'गिनपिग' कादंबरी आधारे अभ्यासणे.

**गृहितके :-**

I) वर्तमान मराठी भाषा व साहित्याचा परस्पर संबंध आहे.

II) वर्तमान मराठी भाषेचा मराठी साहित्यावर प्रभाव आहे.

III) 'गिनिपिग' कादंबरीत सामान्य माणसाचे होणारे वस्तुकरण याचे चित्रण आले आहे.

IV) 'गिनिपिग' कादंबरीत अहिराणी भाषेतील वर्तमान काळातील शब्द, म्हणी, संवाद वाकप्रचार यांचा प्रभावी वापर केला आहे.

**संशोधनपद्धती :-**

प्रस्तुत विषयाचे संशोधन करण्यासाठी वर्णनात्मक व तुलनात्मक विश्लेषण अभ्यासपद्धतींचा उपयोग केला आहे. अभ्यास करताना माहितीचा स्त्रोत हा प्राथमिक माहितीच राहिला आहे. अभ्यासकांचे ग्रंथलेखन, मासिके वर्तमानपत्र, सोशल मिडियाच्या माध्यमातून संकलित केलेल्या माहितीचे वर्गीकरण, विश्लेषण करुन निष्कर्ष काढले आहेत.

'फुले-शाहू-आंबेडकर' महाराष्ट्राचं सेंद्रियत्व असणारा विचारव्युह जोपासत सकस आणि कसदार लेखन करणारे महत्वाचे कादंबरीकार म्हणजे राकेश वानखेडे. आदिवासीपाडयावर शिक्षक म्हणून कार्यरत. त्यांच्या 'पुरोगामी' 'पुन्हा शंबुक' या कादंबऱ्या प्रसिद्ध. पंचविस पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित असणारे लेखक. करोना जागतिक महामारीच्या पार्श्वभूमीवर अकरा एप्रिल दोन हजार एकेविसमध्ये हस्ताक्षर प्रकशन गृहाने प्रकाशित केलेली 'गिनिपिग' ही त्यांची मैलाचा दगड ठरणारी कादंबरी. कादंबरीचा निवेदक करोना पॉझिटिव्ह निघाल्यामुळे त्याला दवाखान्यात क्वारंटाइन केलेल आहे. त्याच्या वॉर्डात तेलंग, खंडू करोना झालेली पेशंट आहे. त्यांना सांगितलेली गोष्ट म्हणजेच 'गिनिपिग' कादंबरी. ग्लोबलायझेशन व खाजगीकरणामुळे माणसाचे जगण्याचे झालेले वस्तुकरण मांडणारी ही कादंबरी आहे. मानवी मूल्य हारवत चाललेल्या समाजाच भेदक दर्शन या कादंबरीतून घडते. कादंबरीचा निवेदक म्हणजेच गठया ही गोष्ट सांगतो. ऋषी आणि गठया ही या कादंबरीतील दोन महत्वाची व्यक्तीरेखा. या दोन मित्राची ही कहाणी. पण दोघांच्या विचारधारा एकदम भिन्न आहेत. कादंबरीची दोन टोक. मंगोल हे त्यांच जन्मगाव. बालपण त्यांच त्याच गावात गेलेल. ऋषी हा उपेक्षित, अठराविश्व दारिद्रय असलेल्या वर्गात जन्मलेला. गठया हा मध्यमवर्गीय. 'मंगोल' या गावाच व त्यातील लोकाच वर्णन सांगताना, निवेदक म्हणतो, "आम्ही मंगोल या गावचे. तालुका मालेगाव, जिल्हा नाशिक. आमच्या गावातले सगळे खत्तर ऐदी, जब्राट कीडखाऊ, लोक आहेत. अक्कडचोद आणि बक्कडचोद या कॅटेगरीतले लोक, जी भैंचोद आणि मादरचोद नंतर येते." सत्तरच्या दशकात बुथ हायजॉक करण्यासाठी ही गाव प्रसिद्ध, त्यामुळे सगळे इतर गाववाले त्या गावातील लोकांचा उल्लेख. 'हे मंगोलचे मुसलमान' करत असत. ऋषीकेश परिस्थितीवर

मात करुन खडकपूर सारख्या प्रसिद्ध आय.आय.टी मधून एम.टेक. झालेला. गठया मात्र ऋषीचे पेपर कॉपी करुन कसाबसा पास होतो व पंचायत समितीत ऋषीकडून घेतलेले पैसे देऊन वशील्याने कारकुन होतो. वाममार्गाने धन कमावतो. एकूणच पांढरपेश्या, नोकरदार वर्गाचे प्रतिनिधीत्व गठया करतो. आत्मटिकात्मक लेखनातून गठया नोकरदार वर्गाचे स्वभाव सांगताना लिहितो, "एक मतलबपिपासू परपोषी गोचीड माझ्या गुणसुत्रात आहे. याच गुणांपायी तर पुढे मी पंचायत समितीत चिकटणे नि पांढरपेशाप्रमत्त, धनदंभगंडग्रस्त झालो." ऋषीला नामांकित कंपनीत मोठया पगारावर नोकरी लागते. सर्व सुविधा त्याला त्याठिकाणी मिळतात. तो देखील ऐश्वर्यसंपन्न जीवन जगत असतो. अचानक एक घडना घडते. कंपनीतील सत्तावीस कामगारांना कामावरुन काढण्यासाठी ऋषीचा वापर होतो. त्यातील एक कामगार राघो ईंदे आत्महत्या करतो. त्याचा मुलगा प्रकाश राघो ईंदेच्या शरीराचे बारीक बारीक तुकडे करुन तो मानवी मांसल भागाचा ढीग ऋषीच्या घरात भिरकावतो. कंपनीन धोरण ठरवून आपल्या स्वाक्षरीने साऱ्यांना बडतर्फ केल. माणसं मारण्याच पाप आपल्याला माथी मारलं हे ऋषीच्या लक्षात येत. 'तुझ्यापायीच माझा बाप गेला... मिस्टर ऋषीकेश घुगे, यु आर अ किलर' या प्रकारचा आवाज त्याच्या कानात सारखा घुमत असे. त्याच्या मनात भावनेचा उद्रेक होतो.

'मानवी प्रतिष्ठेचं हनन करण्याचा अधिकार कुणालाही नाही. तो आपला बॉस असला तरी त्याला तो नसावा. कुणाच्याही गाठीशी आपण दैन्य बांधू शकतो, हा आत्मविश्वास बॉस नावाच्या प्राण्यात असेल, तर तो आत्मविश्वास गाडला पाहिजे. नुसता आत्मविश्वास गाडता येत नसेल तर त्या बॉसला देखील गाडावे' असे म्हणून तो कंपनीचा मॅनेजर प्रदुम्न युजर्वेद याचा करतो आणि अंडरग्राउंड होतो. या काळात तो नाशिकरोड स्टेशन जवळील स्लमवस्तीत वत्सलाबाईच्या येथे किरायाने राहतो. नंतर तो पूर्णपणे बदलतो. त्याचा शाळकरी मित्र दलपत जानू उर्फ घाऱ्या यांने लिहिलेला 'क्रायसिस अँड सोल्युशन' या पुस्तकामुळे तर त्याच्यात आमुलाग्र परिवर्तन होते.

सर्वांकडून सर्वांची प्रतिष्ठा मान्य होईपर्यंत संग्राम करण्याच तो गठयाला बोलून दाखवतो. शाळेत असताना गेनु मास्तरान खाऊजा धोरणाचे सांगितलेले दुष्परिणाम त्याला आठवतात. "मुलानं जराजर्जर विश्वगुरु मारतात खाऊजा धोरण आलं तर पोरींच्या आंग्या, पोरांच्या चड्डया बदलतीन, नटनटया साबु, डायपर्स आणि मालिशवाल तेल विकतील क्रिकेटर कपडे, सेन्टक्रीम, वेपर्स विकतील. नेते देश तर मिडलक्लास आपला इमान, गरीब आपले आसू विकतील." ग्लोबलायझेशन, तसेच खाजगीकरणामुळे सामान्य माणसाचं जगण कस अवघड होऊन बसल आहे. भारतासारख्या देशात या धोरणामुळे गरीब गरीब होत चालला आहे आणि भांडवलदार, मध्यमवर्गीय गब्बर होत असल्याचे दोष ऋषीला दिसतात. त्यामुळे कोणत्याही साम्राज्यवादी व्यक्तींना मदत होईल, त्या व्यक्ती आपला वापर करतील असे धर्माचे नाही हे तो कटाक्षाने ठरवतो. श्रीमंत, भांडवलदार यांच्या जवळचे धन हे गरीब लोकांचे आहे. लोकाच जगणं नरक करणाऱ्यांना जगण्याचा काही एक अधिकार नाही म्हणून तो जानकीदास मफतलालचा गळा दाबून मारुन टाकतो. अनेक गुन्हयात आरोपी असलेला ऋषी पोलिसांना हवा असतो. गठयाच पोलीसांना मदत करतो ऋषीला फाशी होते फाशीपूर्वी तो गठयाला म्हणतो, "गठया तू माझा ठावठिकाणा पोलिसांना कळवला, मला पकडून दिले, तू गद्दारी केली, असे मी म्हणणार नाही. कारण त्याचे कोणतेही दुःख मला मरताना नाही. दुःख एकच ते म्हणजे तू शेवटी बुर्झ्वा झालास, आणि येथे कादंबरी संपते,

वर्तमानकालीन मराठी भाषेतच ही कादंबरी उलगडत जाते. बेगडी वागणाऱ्या लोकाचा समाचार घेताना, "आईबाप आणि गुरु यांना हे यश अर्पण करतो असं म्हणायचा चिवत्यापणा, कोडगेपणाचा शो केला नाही. आपण लंड बाय संड, आपल यशही असंच लंड बाय संड, लातुर पॅटर्नमध्ये पहिल्या आलेल्या झ्याटूजींनी काय दुनियाचे भारे बांधले? कुठं गडप झाले, ते सगळे बोर्डातले स्कॉलर? जागतिकीकरणाचे परिणाम जीवनाच्या सर्व क्षेत्रावर झाले आहेत. "खाऊजा धोरणामुळे देशात सायलेंट हाहाकार झाला. ज्याची कल्पना करता येणार नाही. या पंचवीस वर्षात दहा करोड लोकांचे रोजगार गेले. पन्नास हजारापेक्षा अधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. ग्रामीण अर्थव्यवस्था डबघाईला आली शहरात स्थलांतर झाली. शहरं म्हणजे जुग्गी झोपडी असे वाटू लागले. सरकारी मालमत्तांचे खाजगीकरण झाले. भांडवलदारांना इन्फ्रास्ट्रक्टचरचे भारतात घबाडच सापडले. लोकशाही इन्स्टिटयूट मोडून पडल्या." एकोनीसे एक्यान्नव साली भारताने खाऊजा धोरण स्वीकारल्यामुळे भांडवलदाराचे कसे फावले व सामान्य माणूस कसा पिळला जात आहे. याचे चित्रण या कादंबरीत येते. खाऊजा धोरणामुळे "माणस दुभंगतील कॉलेज कट्टयावर पोरं-पोरी बियरचे घोट घेऊन डेमोक्रेसी इस द फकिंग गाय म्हणतील. त्याचवेळी एखादा दाढी वाढलेला, गळयात शबनमवाला गुलजार, सिगारेट पेटवण्यासाठी माचिस विचारत येईल, आणि का? म्हणून पुसल्यास, तो सांगेल, सिगारेट के साथ साथ बहुत सारी चीजे है, जिन्हे मैं फूक देना चाहता हू।" सामान्य माणसाची असणारी ही कडवट प्रतिक्रिया वर्तमान मराठी भाषेतून वापरणाऱ्या हिंदी चित्रपटातील संवादातून व्यक्त झाली आहे.

ग्लोबल व्यवस्थेमध्ये माणसावर विविध प्रयोग प्रयोग केले जात आहेत. माणसाच माणूस म्हणून असणार मूल्य या व्यवस्थेत नाकारल जात आहे. "शिकाऊ मेडिकलची स्टुडंट आपल्या टेबलावर उंदर आणि बेडकं फाडतात. त्यांचा सगळा कोथळा, रक्तवाहिन्या, पेशी, काळीज बाहेर काढतात. प्रयोग करतात, तो झाल्यावर पुन्हा जागच्या जागी ठेवून शिवून काढतात. ही सगळी ग्लोबल व्यवस्था माझे माणूसपण गाढून माझ्यावर अगणित प्रयोग करते आहे." भांडवलशाही

व्यवस्थेत नफेखोरपणामुळे माणसावर विविध प्रयोग केले जात आहेत. मार्केटिंगने माणसाच जीवन नियंत्रित केले आहे. "मार्केट आमच्या चुलीपर्यंत शिरलय. आपल्याला सवयी लावल्या जातात, बिघडविल्या जातात आता अंघोळ ही आपली वैयक्तीक बाब राहिली नाही, अंघोळ आपली, टर्नओव्हर त्यांचा. साबण, शाम्पू, तेल, मसाज, थेरेपी, विविध लिक्विडं सौंदर्यप्रसाधने, गुलाबजल, फाया, अत्तरे, उघडयावरच शौच आणि उघडयावरची अंघोळ बाद करुन चार भिंतीत गेलो आणि मार्केट फोर्सचा घटक झालो." जाहिरातींचा भडिमार करुन लोकांना सवयी लावल्या जातात व त्यांच्या खिशातील पैसा पद्धतशीरपणे काढून घेऊन भांडवलदार गब्बर होत आहेत.

समाजाला दिशा देण्याच काम पांढरपेशा वर्ग करतो. पण हाच पांढरपेशा मध्यमवर्ग संकुचित वागत आहे. त्याला कोणाशीच काही देणघेण उरल नाही. तो आपला पत्नी, मुल-बाळ, नातेवाईक एवढयातच मशगुल आहे. "टोटली मला माझं मध्यमवर्गीकरण होण, हाच माझ्या शिक्षणाचा, जगण्याचा, जन्म घेण्याचा मथितार्थ असेल तर मला असं कधीच जगायच नव्हतं. माझा नकार आहे या दळभद्रीपणाला जगाच्या कोणत्याही उज्ज्वल चळवळीच्या ऱ्हासास हाच वर्ग कारणीभूत असतो."

या कादंबरीत काही खास वैशिष्ट्यपूर्ण असे शब्द आहेत. पांढरपेशाप्रमत्त, धनदंभगंडग्रस्त, शिष्णोदरपरायण मानवजात, उत्क्रांतीसटायर, उत्क्रांतीलंड, ऍंथ्रोपोलॉजीभपारे असे काही शब्द सांगता येतील. यातील काही संवाद 'उपरीसुरतश्रांतललना पैकी एकही फिंद्री पास नव्हती.' 'टेबलावर बसून बत्तीस वेळा घास चावून खाणाऱ्या ऐडभोक्या लोकांमध्येच आपण जन्म घ्यायला पाहिजे यार.' 'खाऊजा धोरण कळतं का तुला? या धोरणात फक्त सेक्स, शराब आणि पैसा तेवढं चालतो, मला या व्यवस्थेचा सॉलिड गिल्ट येता बॉस।', 'गठया, भांडवलदाराची बटीक आहे रे आपली बुद्धी, जिच्यावर ते राजरोस चढतात, त्यांनाच आपण सॅल्यूट ठोकायचा? आपली डेमाक्रसी गुलामी संवर्गातील आहे. तिथं आपल्या बुद्धीच काय काम.' 'सगळया नीतिमुल्यांचा घंटा झालाय आणि माणुसकीचा फोदा.' 'याला म्हणतात ग्लोबलायझेशन वेसवेच लावण्य जसं घातक तसं हे मायावी असत भौ.' 'गठया तुझा प्रॉब्लेम काय आहे माहितीय? तुम्ही लोक काहीही वाटून घ्यायला तयार नाहीत.' 'तुही तुझ्या बहिणीसारखं जीवाच नाव लवडा ठेव, नवरा सोड, गुल-गुलनार-गुलछबू बन. मग बघ जग तुझी हौसमौज करायला कसं धावतं ते.' 'जातिसंस्थेसारख्या उपद्रवी संस्थेचे तुष्टीकरण सुरु झाले.' यांसारख्या अनेक संवादातून वर्तमानकालीन समाजाच जगणं, भोगण, वागण, तेवढयाच ताकदिने लेखकाने वर्तमानकालीन मराठी भाषेत जोरकसपणे मांडले आहे.

अहिराणी भाषेतील असंख्य म्हणी या कादंबरीत पानोपानी आढळतात. 'समदं गाव गोताचं तरीबी अंग मरलं मुताचं' 'हांडग्यासोबत गेलं उंडगं ते निघाल शेर आणि हे लांडगं' 'मनी नाही नांदणं आणि दिवाळीत चांदण,' 'गावा नी खावा लाथ, पण सोयरांना खाऊ नये भात' 'घरची मागे लेकरु, आणि दारची पाडू दे पोर' 'कोपर देखी थुके नि जागा देखी मुतो' 'घ्या बंबुरा अन् करा अंगुरा' अशा काही म्हणी सांगता येतील, एकाच वेळी वर्तमानकाळातील मराठी भाषा आणि अधून मधून बोलीभाषेचा केला जाणारा अवलंब परस्परासी एकजीव झालेला दिसून येतो.

थोडक्यात राकेश वानखेडे यांनी ग्लोबलायझेशन व खाजगीकरणामुळे मानवी देह हे सर्वाधिक व्यापाराचे केंद्र बनत चाललेला आहे. त्याच्या जगण्याचे वस्तुकरण झाले आहे. मानवी मूल्य पायदळी चिरडली जात आहेत. आपला उत्कर्ष करावा की, मूल्य धरुन चालावे असा मोठा संघर्ष या कादंबरीतून येतो. वर्ग संघर्षाची सुद्धा ही कादंबरी ठरते. या संदर्भात आसाराम लोमटे लिहितात, 'गिनीपीग' या कादंबरीतून येणारे जग हे माध्यमांच्या विस्फोटाचे आहे. समाजमाध्यमांवरुन अष्टोप्रहार फेसाळणाऱ्या भासी-अभासी दुनियेचे आहे. भरभराटची लालसा बाळगून ती पुरी करण्यासाठी आडवेतिडवे धावणाऱ्या नवश्रीमंताचे आहे. वैद्यकीय शिक्षणाच्या प्रक्रियेत विद्यार्थी आपल्या टेबलावर उंदरं आणि बेडकं फाडतात, काही अवयव बाहेर काढतात, अभ्यासतात आणि प्रयोग झाल्यावर पुन्हा शिवून काढतात. ही सगळी ग्लोबल व्यवस्था माणसाचे माणुसपण गाडून त्याच्यावर अगणित प्रयोग करते." मराठीतल्या लोकप्रिय कादंबरीच्या परंपरेला बळी न पडता आपली स्वतंत्र वाट चोखाळत लेखकाने वर्तमान कालीन प्रश्न तेवढयाच ताकदीने वर्तमान मराठी भाषेत मांडले आहेत.

**संदर्भ ग्रंथ :**


I) गिनिपिग – राकेश वानखेडे

II)परिवर्तनाचा वाटसरु – माहे सप्टेंबर 2021

III)साहित्याचे मानदंड – गंगाधर गाडगीळ

IV)मराठी कादंबरी – प्र.वा. बापट.

V)मराठी नवकादंबरी – सारंग विलास.


PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani

❑❑❑